RAJGURU MAHAVIDY... RAJGURU ...



आज दि. ६ नोव्हेंबर २०१७ रोजी मराठी विभागाची सभा अ. ११.४५ वा. मराठी विभागात आयोजित करण्यात आली. सभेस खालील प्राध्यापक उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे — [signature]
डॉ. बाळासाहेब अनुसे — [signature]
प्रा. वर्षा कांबळे — [signature]
प्रा. एस. व्ही. धानापुने — [signature]

सभेत खालील विषयांची चर्चा करण्यात आली
विषय क्र. १ – प्रथम सत्राचा अभ्यासक्रम पूर्तता अहवाल व निकाल यासंदर्भात आढावा घेण्यात आला.
विषय क्र. २ – दि. १ ते १५ जानेवारी २०१८ दरम्यान मराठी भाषा पंधरवडा साजरा करण्यासंदर्भात चर्चा झाली. डॉ. संदीप सांगळे यांना व्याख्यानासाठी बोलवावे असे ठरले.
विषय क्र. ३ – मराठी विभागाची शैक्षणिक सहल आयोजित करण्यासंदर्भात चर्चा झाली. जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात कोल्हापूर – पन्हाळा – जोतिबा – रत्नागिरी – गु गणपतीपुळे – केशवसुत स्मारक – मुरुडगड – प्रतापगड – महाबळेश्वर – भिलार पुस्तकांचे गाव – वाईचा ढोलगणपती अशी सहल काढावी. सहभागी विद्यार्थ्यांकडून २०००/- रु फी लवकर जमा करावे असे ठरले.

विषय क्र. ४ – दि. ३ जानेवारी २०१८ रोजी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबरावजी बुट्टेपाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले त्यात सहभागी होण्यासंदर्भात ठरले.

विषय क्र. ५ – मराठी विभागातील विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासंदर्भात चर्चा झाली. त्यांचे गृहपाठ तपासणे, तयारी करुन घेणे, आदि मुद्द्यांवर चर्चा झाली.

शेवटी सर्वांचे आभार मानून सभा समाप्त झाली.

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA ★ RAJGURU NAGAR

डॉ. संजय शिंदे.

मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.